# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६. विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com

दिनांक : ०४/०१/२०२४

# प्रेसनोट

**महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांवरील बेकायदेशीर बेवारस वाहने यांचेविरुध्द कारवाई.**

०१. उल्हासनगर शहरात अनेक ठिकाणी शहरातील मुख्य रस्त्यांवर दुचाकी व चारचाकी विक्रेते त्यांची वाहने विक्री होत असल्याचे व यामुळे रहदारीस अडथळा होत असल्याचे निदर्शनास आले होते. महानगरपालिका क्षेत्रात बेवारस वाहन पडून असल्यामुळे शहरातील नागरीकांच्या व लोकप्रतिनिधी यांच्या वारंवार तक्रारी प्राप्त होत असल्यामुळे बेकायदेशिर बेवारस वाहनांवर धडक कारवाई करणेसाठी विशेष मोहिम आयोजित करण्याबाबत मा. आयुक्त, श्री. अजीज शेख यांनी आदेश दिले होते.

०२. त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त (शहर) श्री. जमीर लेंगरेकर, यांचे मार्गदर्शनाखाली महापालिका क्षेत्रात विविध ठिकाणी मुख्य रस्त्यांवर मोठया संख्येने पडून असणा-या बेकायदेशिर बेवारस वाहनांवर शहर वाहतुक शाखा, संबंधित पोलीस स्टेशन व सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ४, उल्हासनगर महानगरपालिका, यांनी संयुक्त धडक कारवाई सुरु करण्यात आलेली आहे. सदर विशेष मोहिमेत दंडात्मक कारवाईपोटी रु. १४,०००/- एवढा दंड वसुल करण्यात आलेला आहे. तसेच एकुण १३ बेवारस वाहन हटविण्यात आलेली आहेत.

०३. शहरातील नागरीकांना सूचित करण्यात येते की, यापुढे देखिल महानगरपालिका अधिकारी, पोलीस अधिकारी व शहर वाहतुक शाखा (Traffic Police) यांचेमार्फत नियमितपणे शहरातील मुख्य रस्त्यांवर व पदपथावर अनधिकृतपणे ठेवण्यात आलेल्या बेकायदेशिर बेवारस वाहने यांचेविरुध्द दैनंदिन नियमितपणे कारवाई सुरु राहणार आहे. याची शहरातील नागरीकांनी नोंद घेऊन शहरात कोणत्याही ठिकाणी बेकायदेशिर बेवारस वाहने ठेवू नये याबाबत दक्षता घ्यावी.

(छाया प्रकाश शार.)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६. विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०४/०१/२०२४

# प्रेसनोट

मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत दिनांक ०३/०१/२०२४ रोजी क्रांतीवीर सावित्रीबाई ज्योतीवा फुले जयंती ,मिड टाऊन हॉल, गोल मैदान, उल्हासनगर – २ येथे सकाळी १२.०० ते ५.०० या दरम्यान साजरी करण्यात आली. यामध्ये उल्हासनगर शहरातील महिलांनी उत्साहाने व आनंदाने सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे यांनी केले. सदर कार्यक्रमात उप आयुक्त, महिला व बालकल्याण विभाग डॉ. सुभाष जाधव तसेच महापालिका सचिव, सौ. प्रतिभा कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे, उपलेखा अधिकारी(शिक्षण विभाग) सौ. निलम कदम, सिस्टम ऍनालिस्ट(ना.सु.केंद्र) सौ. श्रध्दा सपकाळे व विभाग प्रमुख समग्र शिक्षण विभाग सौ. संगिता लहान, सौ. सलोनी निवकर - जनगणना/आधार विभाग, श्री. राजेश घनघाव - दिव्यांग विभाग, श्री. शांताराम चौधरी - क्रिडा विभाग, श्री. नितेश रंगानी-महिला व बालकल्याण हे उपस्थित होते.

मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अजिज शेख साहेबांनी महिलांना चुल व मुल याच्या व्यतिरिक्त स्त्रियांनी शिक्षणाकडे, जास्तीत-जास्त लक्ष दयावे असे प्रेरणादायक व सकारात्मक मार्गदर्शन केले. तसेच क्रांतीवीर सावित्रीबाई ज्योतीबा फुले यांनी त्याकाळात १८ व्या शतकात मुलींची पहिली शाळा सुरु केली व अनोनात मेहनत घेतली याबाबत माहिती दिली. सांस्कृतीक कार्यक्रमाचे सुत्र संचालक सौ. सविता हांडे यांनी केले. सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये सावित्रीबाई फुले, महात्मा फुले व डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांच्या जीवनावर गीत, सांस्कृतीक नृत्य सादर करण्यात आले. तसेच मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे हस्ते कार्यक्रमात उपस्थित महिलांना पारितोषिके व बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.